- ४०० ०,
UMBAI - 400 032.

# जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,
# जिल्हा परिषद अकोला
## (जाहिरात)

अकोला जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत या कार्यालयाचे अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र येथील महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील रिक्त असलेल्या १४ जागेवर M.B.B.S. व पदव्युत्तर पदवी/पदवीका अर्हता धारकांमधून नियमित वैद्यकिय अधिकारी नियुक्तीने/बदलीने रुजु होई पर्यंत किंवा ११ महिन्याकरीता यापैकी अगोदर घडेल तोपर्यंत तदर्थ वैद्यकिय अधिकारी गट-अ म्हणून नियुक्ती द्यावयाची असून, विहीत शैक्षणीक अर्हताधारक उमेदवारांकडून खालील अटीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे**

| | |
|---|---|
| १) पदाचे नांव | :- तदर्थ वैद्यकिय अधिकारी म.वै.आ.से गट-अ |
| २) शैक्षणीक अर्हता | :- एम.बी.बी.एस अर्हता |
| ३) वयोमर्यादा | :- जाहिरातीचे दिनांकास वय ५८ वर्ष पेक्षा जास्त नसावे. |
| ४) अर्ज सादर करण्याचा कालावधी | :- दिनांक ०९/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ (सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज स्विकारल्या जातील) |
| ५)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | :- १५/०५/२०२६ |
| ६) अर्ज सादर करण्याचा पत्ता | :- जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अकोला अर्ज कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) स्विकारल्या जातील |

स्पष्टीकरणः- कंत्राटी तत्वावर काम करित असतांना कोणत्याही प्रकारे भविष्यात कायमस्वरुपी अथवा नियमित नेमणूक मिळणार नाही व उमेदवाराने तसे गृहीत धरु नये, अथवा कंत्राटी नियुक्तीवरील उमेदवार तसा हक्क मागू शकणार नाही. नियमित सेवेतील उमेदवार उपलब्ध झाल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता तदर्थ वैद्यकिय अधिका-यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. मुलाखती दिलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना अकोला जिल्हयांतर्गत कोणत्याही प्रायमिक आरोग्य केंद्रात निकड लक्षात घेवून वैद्यकिय अधिकारी गट-अ हया पदावर कंत्राटी तत्वावर नेमणूक दिली जाईल. या करिता इच्छूक उमेदवारांनी या कार्यालयाकडुन विहीत केलेल्या दिनांकाला कागदपत्र पडताळणी/मुलाखतीला मुळ शैक्षणीक व इतर आवश्यक दस्ताऐवजासह/ प्रमाणपत्रासह प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक राहील.

शासन निर्णय क्रं.मवैअ-१०५४/ प्र.क्र.२४१/ सेवा-३ दि. ०२.०३.२०१५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे एम.बी.बी.एस. पात्रता धारकांना इतर भागा करिता ७५०००/- इतके एकत्रीत दरमहा मानधन दिले जाईल.

| | |
|---|---|
| टिप १) | :- अर्जासोबत फोटो, शैक्षणीक अर्हता, ( तिन्ही वर्षाचे गुणपत्रीका), पदवि प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र, वयासंबधी दाखला, महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे/भारतीय वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, आंतरसावीयता प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र (MSCIT), असल्यास अनुभव प्रमाणपत्र, तसेच मागास वर्गीय असल्यास तत्संबंधी जातीचा दाखला, जातपडताळणी वैद्यता प्रमाणपत्र साक्षांकित देणे आवश्यक राहील. |
| टिप २) | :- नियुक्तीसाठी इच्छूक असलेल्यां उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील अर्जासह टिप १ मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षाकिंत छायाप्रतीचे संचासह अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद अकोला येथे दिनांक १५/०५/२०२६ पूर्वी सादर करावा. विहित मुदतीत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. विहित मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांना या कार्यालयाकडुन कळविण्यांत आलेल्या दिवशी कागदपत्र पडताळणी/मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. उमेदवारास मुलाखतीसाठी वेगळे मुलाखतपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| टिप ३) | :- उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता मुळ प्रमाणपत्रासह या कार्यालयाकडुन कळविण्यात आलेल्या दिनांकाला हजर राहणे आवश्यक राहील. कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. अपात्र ठरल्यास, कागदपत्र पडताळणीच्या वेळीच त्यांना त्रुटी कळविल्या जातील, या बाबत पुन्हा वे गळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. या बाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| टिप ४) | मुलाखतीचे दिनांक व स्थळ ठरविणे अथवा त्यामध्ये बदल करणे, मुलाखत प्रक्रिया रद्द करणे या बाबत सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी, अकोला यांचे अध्यक्षतेखालील समितीला राहतील. |

स्वा/-
सदस्य सचिव
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद अकोला